आत्मा माझा असेल का ~~प्रश्न?~~ धारणू २००७ ५२७ ३८ ९७५६

मार्ग तुझा चालहि तुझी
ध्येय माझे असेल का?

डोळे तुझे दृष्टिहि तुझी
सृष्टि माझी असेल का?

उद्यान तुझे फुलहि तुझे
सुगंध माझा असेल का?

रंग तुझा ढंगहि तुझा
छंद माझा असेल का?

रान तुझे गानहि तुझे
भान माझे असेल का?

नूर तुझा सूरहि तुझा
उर माझा असेल का?

यंत्र तुझे तंत्रहि तुझे
मंत्र माझा असेल का?

तन तुझे मनहि तुझे
आत्मा माझा असेल का?

३।१।८२ सहदेव भरवाड